बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार

(अधिनियम - २००९)

शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

पाणी व स्वच्छता सहाय्य योजना

हस्तपुस्तिका

unicef

unite for children

अनुक्रमणिका

क्र. सं.	विषय	पान क्रमांक
१	घटनात्मक तरतूद	१
२	बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ ठळक वैशिष्ट्ये	२
३	अधिनियम, २००९ मधील तरतुदींचे स्पष्टीकरण	३-६
४	बालकांचे हक्क	७
५	शासन व स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये	८-९
६	शाळांची जबाबदारी	१०
७	शिक्षकांची कर्तव्ये	११
८	समाजाची जबाबदारी	१२-१४
९	बालस्नेही शिक्षण	१५
१०	अधिनियम, २००९ अनुसूची (मानके व निकष)	१६-१९

घटनात्मक तरतुद

- शिक्षणाचा सामाईक सूचीमध्ये अंतर्भाव.
- घटनेतील कलम ४५ नुसार बालकांना १४ वर्षे वयोगटापर्यंत मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याबाबात राज्याच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये समावेश.
- सन २००२ मध्ये ८६ व्या घटना दुरुस्तीनुसार कलम २१ अ घटनेत अंतर्भूत त्या अन्वये ६ ते १४ वयोगटातील बालकांना शिक्षणाचा मूलभूत अधिकार देण्याबाबत राज्यांना सूचना.
- केंद्र सरकार कडून दिनांक २६ ऑगस्ट, २००९ अन्वये शिक्षणाचा अधिकार कायदा मंजूर.
- या कायद्याची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २०१० पासून जम्मू व काश्मिर वगळून देशभरात लागू.
- मा. सर्वोच्च न्यायालयाने शिक्षणाचा अधिकार कायदा दिनांक १२ एप्रिल, २०१२ रोजी वैध ठरविला.

2002

2009

2010

2012

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९- ठळक वैशिष्ट्ये

- ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याचा अधिकार प्राप्त.
- शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मोफत शिक्षण. त्यामध्ये सर्व प्रकारचे शुल्क आणि शिक्षणास आवश्यक खर्चाचा समावेश.
- प्रत्येक पालकाने आपल्या पाल्यास नजिकच्या प्राथमिक शाळेत शिक्षणासाठी दाखल करणे हे पालकांचे कर्तव्य.
- प्रत्येक बालकास भय, ताण-तणावमुक्त, भेदभावमुक्त व बालकेंद्री, बालस्नेही वातावरणात शिक्षण देण्याची शाळांची जबाबदारी.
- शासनावर स्थानिक प्राधिकरणामार्फत बालकांना त्यांच्या नजिकच्या परिसरात शाळा, पुरेसे प्रशिक्षित शिक्षक, आवश्यक वर्गखोल्या व इतर भौतिक सुविधा पुरविण्याची जबाबदारी.
- शिक्षण प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शाळेच्या कामकाजावर समाजाचे संनियंत्रण.



अधिनियम, २००९ मधील तरतुदींचे स्पष्टीकरण

- बालक म्हणजे कोण?

  ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलगा किंवा मुलगी.

- प्रारंभिक शिक्षण म्हणजे काय?

  इयत्ता १ ली ते ८ वी वर्गापर्यंतचे शिक्षण.

- शाळा म्हणजे काय?

  प्रारंभिक शिक्षण देणारी मान्यताप्राप्त शाळा.

- स्थानिक प्राधिकरण म्हणजे काय?

  जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगर पंचायत, कटक मंडळ, ग्रामपंचायत, इत्यादी संस्थांचा समावेश.

- बालकाचा अधिकार म्हणजे काय?

  अशी बाब जी प्रत्येक बालकास मिळावयास हवी. बालकांचा अधिकार म्हणजे बालकांना मोफत व सक्तीचे प्रारंभिक शिक्षण मिळणे.

अधिनियम, २००९ मधील तरतुदींचे स्पष्टीकरण

मोफत शिक्षण: कोणासाठी?

- ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांसाठी. विशेष गरजाधिष्ठित बालकांकरीता १८ वर्षे वयोगटापर्यंत. प्रारंभिक शिक्षण वयाच्या १४ वर्षापर्यंत पूर्ण न झाल्यास तद्नंतरही इयत्ता ८ वी पर्यंतचे शिक्षण.

मोफत म्हणजे काय?

- जे शिक्षण मोफत मिळणार आहे त्यामध्ये नेमकं काय मोफत मिळणार, सक्ती कशाची, सक्ती कोणावर हे समजून घेणे आवश्यक आहे.
  - कोणत्याही प्रकारचे शुल्क नाही.
  - गणवेश, पाठयपुस्तके, लेखन साहित्य मोफत.
  - सर्व बालकांना इयत्ता ८ वी पर्यंतचे शिक्षण घेण्यास कोणताही खर्च नाही.

मोफत शिक्षण : कोणत्या शाळांमध्ये?

- सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये.
- सर्व खाजगी अनुदानित शाळांमध्ये.

अधिनियम, २००९ मधील तरतुदींचे स्पष्टीकरण

- वंचित गट व दुर्बल घटकातील बालकांसाठी २५ टक्के जागा राखीव
  - सर्व विनाअनुदानित खाजगी शाळांमध्ये (मदरसा, वैदिक व धार्मिक शिक्षण देणाऱ्या संस्था वगळून).
  - विनाअनुदानित खाजगी शाळांमध्ये पहिल्या इयत्तेत प्रवेश. या शाळांमध्ये पूर्व प्राथमिक शिक्षणाची सुविधा असल्यास त्या वर्गात प्रवेश.
  - २५ टक्के राखीव जागांसाठी शाळांना शासकीय दराने खर्चाची प्रतिपूर्ती.
- वंचित गट व दुर्बल घटकातील बालक म्हणजे काय?
  - वंचित गट- अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती
  - दुर्बल घटक- ज्या बालकाच्या माता-पित्याचे वार्षिक उत्पन्न एक लाख रूपयांपेक्षा कमी आहे असे विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, राज्य शासनाने सूचित केलेले धार्मिक अल्पसंख्याक व इतर बालक.
- सक्ती कोणावर?
  - शासन
  - स्थानिक प्राधिकरण
  - शाळा
  - शिक्षक

अधिनियम, २००९ मधील तरतुदींचे स्पष्टीकरण

- पालकांचे कर्तव्य :
  - आपल्या बालकास नजिकच्या शाळेत दाखल करणे.
- सक्तीचे शिक्षण म्हणजे काय?
  - ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास मोफत प्रारंभिक शिक्षण,
  - प्रत्येक बालकाच्या सक्तीच्या प्रवेशाची, हजेरीची आणि त्याचे प्रारंभिक शिक्षण पूर्ण केले जात असल्याची खात्री करणे.
  - नजिकच्या शाळेच्या उपलब्धतेची खातरजमा करणे.
  - दुर्बल घटकांतील बालकांस आणि तसेच उपेक्षित गटातील बालकास कोणत्याही कारणावरून प्रारंभिक शिक्षण घेण्यापासून भेदभाव केला जाणार नाही आणि ते पूर्ण करण्यापासून त्यास प्रतिबंध केला जाणार नाही याची खातरजमा करणे.
  - पायाभूत सुविधा आणि शाळेची इमारत शिक्षक कर्मचारी वर्ग व अध्यापन साधन सामग्री पुरविणे.
  - विशेष प्रशिक्षण सुविधेची तरतूद करणे.
  - अनुसूचिमध्ये विनिर्दिष्ट केलेली मानके व निकष यांना अनुरूप असणारे उत्तम दर्जाचे प्रारंभिक शिक्षण दिले जात असल्याबाबतची खात्री करणे.
  - प्रारंभिक शिक्षणासाठी अभ्यासक्रम आणि स्वाध्याय पाठ्यक्रम वेळेवर विहित करण्याची खातरजमा करणे.
  - शिक्षकासाठी प्रशिक्षण सुविधा पुरविणे.



बालकांचे हक्क

- कधीही शाळेत न आलेल्या, अनाथ, बेघर, कठीण परिस्थितीतील सर्व वंचित बालकांना शाळेत शिक्षणाचा हक्क.
- शाळाबाहय बालकांना वयानुरूप समकक्ष वर्गात प्रवेश.
- ३० दिवसापेक्षा जास्त सतत गैरहजर, स्थलांतरीत बालकांना नियमित शाळेत शिक्षणाची सुविधा (हंगामी वसतिगृह, वाहतूक सुविधा, निवासी शाळा, निवासी वसतिगृह, इ.)
- अभ्यासात मागे पडणाऱ्या बालकांना विशेष प्रशिक्षण.
- विशेष गरजा असणाऱ्या बालकांना शिक्षणासाठी आवश्यक सहाय्यभूत सेवा व सुविधा.
- मोफत पाठयपुस्तक, गणवेश, लेखन साहित्य, इ. लाभ.

शासन व स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये

- एक कि.मी. परिसरातील इयत्ता पहिली ते पाचवी ची प्राथमिक शाळेची सोय.
- तीन कि.मी. परिसरात इयत्ता सहावी ते आठवी ची उच्च प्राथमिक शाळेची सोय.
- ३० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक उच्च प्राथमिक स्तरासाठी.
- किमान दोन प्रशिक्षित शिक्षक-प्राथमिक शाळा
- किमान तीन विषयनिहाय पदवीधर प्रशिक्षित शिक्षक-उच्च प्राथमिक शाळा.
- प्रत्येक शिक्षकासाठी एक वर्गखोली.
- शिक्षकास अन्य शाळेत, कार्यालयात अथवा अन्य अशैक्षणिक (जनगणना, आपत्ती निवारण व निवडणूकीची कामे वगळून) कामी वापरता येणार नाही.
- कोणत्याही मंडळाची परीक्षा घेण्यास प्रतिबंध.



शासन व स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये

प्रत्येक शाळेत-

- मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह
- शुध्द पिण्याच्या पाण्याची सुविधा.
- उतार **(Ramp)**
- संरक्षक भिंत.
- ग्रंथालय.
- खेळाचे मैदान.
- मध्यान्ह भोजनासाठी स्वयंपाकगृह

शाळांची जबाबदारी

- विनाशुल्क व मोफत शिक्षण.
- प्रवेशासाठी कॅपिटेशन फी, छाननी किंवा चाळणी प्रक्रिया अवलंबविण्यास प्रतिबंध
- वयाच्या पुराव्याअभावी प्रवेश नाकारता येणार नाही.
- शैक्षणिक वर्षात बालकास कधीही प्रवेश.
- शाळेमध्ये कोणत्याही वर्गात मागे ठेवता येणार नाही.
- प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढता येणार नाही.
- शारिरीक किंवा मानसिक त्रास देता येणार नाही.
- मानके व निकषांची पूर्तता करून प्राधिकरणाकडून मान्यता प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय शाळा सुरू करता येणार नाही.
- प्रत्येक शाळेत ७५ टक्के पालकांचा समावेश असलेली शाळा व्यवस्थापन समिती गठन अनिवार्य.
- कोणत्याही मंडळाची परीक्षा घेण्यास प्रतिबंध.

शिक्षकांची कर्तव्ये

- शिक्षक शाळेत दररोज नियमित आणि वेळेवर उपस्थित राहतील.
- अभ्यासक्रम नियोजित वेळेत अपेक्षेनुसार पूर्ण करतील.
- प्रत्येक मुलाच्या अध्ययन क्षमतेचे मूल्यमापन करून आवश्यकतेनुसार विशेष अध्यापन वर्गाचे आयोजन करतील.
- पालक भेटी व बैठकांच्या माध्यमातून बालकांच्या प्रगतीचा आढावा.
- शालेय परिसरातील शाळेत न जाणाऱ्या बालकांचा शोध घेऊन त्यांना शाळेत दाखल करून त्यांची उपस्थिती सुनिश्चिती.
- प्रत्येक बालकाची संकलित नोंद पत्रक फाईल अद्यावत ठेवतील.
- अभ्यासक्रम, पाठ्यक्रम व मुल्यमापन प्रक्रिया व प्रशिक्षण कार्यक्रमात विकसनात सहभाग.
- खाजगी शिकवणीस प्रतिबंध.
- कर्तव्यात कसूर करणाऱ्या शिक्षकाविरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद.
- विहीत करण्यात येतील अशी सर्व कर्तव्ये पार पाडणे.
- आनंददायी, नाविन्यपूर्ण पध्दतींचा अध्यापनात वापर व तणावमुक्त अध्ययन प्रक्रियेचा अवलंब.
- शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये सदस्य शिक्षकाने सक्रिय सहभाग घेणे.
- खाजगी शिकवणी न घेणे अथवा खाजगीरित्या शिकविण्याच्या कामात स्वत:ला गुंतवून न घेणे.
- बालकांना शारीरिक शिक्षा न करणे किंवा त्याचा मानसिक छळ न करणे.
- शिक्षकांनी पाठाच्या तयारी करण्यासह आठवडयाला ४५ तास काम करायचे आहे.
- दशवार्षिक जनगणना, निवडणुकीची कामे व आपत्ती व्यवस्थापनाची कामें अपवाद वगळता अन्य अशैक्षणिक कामे शिक्षकांना देता येणार नाहीत.



समाजाची जबाबदारी

- शिक्षणात समाजाचा सक्रिय सहभाग घेण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती गठन व त्यांच्याद्वारा शालेय विकास आराखडा निर्मिती.

१) शाळा व्यवस्थापन समितीची रचना

- विनाअनुदानित शाळा वगळता इतर सर्व प्रकारच्या शाळांसाठी शाळा व्यवस्थापन समिती गठीत करण्यात येईल व ती प्रत्येक २ वर्षांनी पुनर्घटित करण्यात येईल.
- या समितीचे ७५ टक्के सदस्य बालकांचे माता वा पिता किंवा पालक असतील.
- उर्वरित २५ टक्के सदस्य हे, ग्रामपंचायत / महानगरपालिका/नगर परिषद, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षण तज्ज्ञ किंवा बालविकास तज्ज्ञ यांमधून निवडले जातील.
- अशा समितीचे ५० टक्के सदस्य हे, महिला असतील.
- शाळेतील दोन विद्यार्थी ज्यापैकी किमान एक मुलगी असेल, स्वीकृत सदस्य म्हणून घेण्यात येतील परंतु त्यांना मतदानाचा अधिकार नसेल.
- शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी बालकांचे मातापिता यांच्यामधून निवड करण्यात येईल.
- खाजगी अनुदानित शाळांच्या बाबतीत शाळेच्या व्यवस्थापनाचा प्रतिनिधी अध्यक्षपदी असेल.
- शाळेचे मुख्याध्यापक (मुख्याध्यापक नसल्यास, वरिष्ठ शिक्षक) शाळा व्यवस्थापन समितीचे पदसिध्द सदस्य सचिव असतील.
- खाजगी अनुदानित शाळांमध्ये ही समिती सल्लागार स्वरूपाची राहील.
- शाळा व्यवस्थापन समिती महिन्यातून किमान एक बैठक घेईल आणि बैठकीची कार्यवृत्ते व निर्णय यांच्या योग्य प्रकारे नोंदी ठेवण्यात येतील व त्या जनतेसाठी उपलब्ध करण्यात येतील.

२) शाळा व्यवस्थापन समितीचे कार्य

- शाळेच्या कामकाजावर देखरेख ठेवणे.
- शिक्षक आपली कर्तव्ये पार पाडत आहेत याची खात्री करणे.
- शाळा शिक्षण हक्क कायद्याशी अनुरूप करणे.
- शाळाबाह्य, विकलांग बालकांचा शोध घेऊन त्यांना शाळेत दाखल करणे व त्यांचे प्रारंभिक शिक्षण पूर्ण होत असल्याची खातरजमा करणे.
- शालेय पोषण आहार योजना व इतर सर्व शासकीय योजनांची अंमलबजावणी सुरळीत व पारदर्शकपणे होण्याच्या दृष्टीने सुयोग्य संनियंत्रण करावे.
- शालेय मंत्रिमंडळ/बालपंचायतीच्या अहवालाद्वारे बालकांचे मत जाणून घेणे.
- शाळेच्या जमा-खर्चाचा वार्षिक लेखा तयार करण्याची व्यवस्था करणे.
- शिक्षणाचा अधिकार कायद्याची जनजागृती मोहिम-शिक्षणाचा हक्क अभियान.
- बाल हक्कांचे संरक्षण - राज्य बालहक्क संरक्षण आयोग.

३) शाळा विकास आराखडा

- शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व्यवस्थापन समितीने शाळा विकास आराखडा तयार करावयाचा आहे.
  - शाळा विकास आराखड्यामध्ये तीन वार्षिक उपआराखड्यासह एक त्रैवार्षिक आराखडा असेल.
  - शाळा विकास आराखड्यात पुढील बाबींचा अंतर्भाव असेल.
- प्रत्येक वर्षासाठी, वर्गनिहाय नांव नोंदणीचे अंदाज
- अनुसूचीमधील मानकांनुसार इयत्ता १ली ते ५ वी साठी आणि ६ वी ते ८ वी साठी स्वतंत्रपणे विचारात घेतलेल्या
  १) इतर नियुक्त्यांखेरीज विषयनिहाय शिक्षक, मुख्याध्यापक आणि अंशकालीन निदेशक यांच्यासह अतिरिक्त शिक्षकांची, तीन वर्षाच्या वरिल कालावधीसाठी, आवश्यक संख्या.
  २) अद्ययावत असलेल्या आवश्यक त्या अतिरिक्त पायाभूत सुविधा व साधन सामग्री
- विशेष प्रशिक्षण सुविधा पुरविण्याची अतिरिक्त गरज.
- वंचित गट दुर्बल घटक यांमधील बालकांसाठी व विकलांग बालकांसाठी शैक्षणिक पुनर्वसन व्यवस्था.

बालस्नेही शिक्षण

- सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण.
- लेखन, वाचन, गणित या व्यतिरिक्त कला, क्रीडा यातील सृजनशील अभिव्यक्तीस वाव.
- कृतियुक्त शिक्षणातून स्थानिक अनुभवाची अध्ययनास जोड.
- सातत्यपूर्ण व सर्वकष मूल्यमापनातून आनंददायी, निर्भय, तणावमुक्त अध्ययनास प्राधान्य.
- भिती, दडपण व चिंतेपासून बालकास मुक्त ठेवणे.
- आपली मते मुक्तपणे व्यक्त करण्यास बालकास मदत करणे.
- मनोरंजक व कृतीयुक्त अध्ययन प्रक्रिया.
- प्रसन्न व उत्साहवर्धक वर्ग व शालेय परिसर.
- शक्य असेल तेथवर शिक्षणाचे माध्यम बालकाची मातृभाषा असणे.
- ज्ञान, कौशल्य, मूल्य आणि वृत्ती यामध्ये वृध्दी करणे.
- बालकाच्या ज्ञान आकलनाचे सातत्यपूर्ण व सर्वकष मूल्यमापन करणे.
- सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने सहशालेय उपक्रमात सहभाग.
- गरजानुरूप भौतिक सुविधांची उपलब्धता.
- छंदाची जोपासना व स्वनिर्मितीचा आनंद.
- शिक्षक व विद्यार्थी आपुलकीचे नाते.

१) शिक्षक :

इयत्ता १ ली ते ५ वी

प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या	शिक्षक संख्या	मुख्याध्यापक
६० पर्यंत	२	-
६१ ते ९०	३	-
९१ ते १२०	४	-
१२१ ते १५०	५	-
१५१ ते २००	५	१
२०१ ते २४०	६	१
२४१ ते २८०	७	१
२८१ ते ३२०	८	१
टिप:- विद्यार्थी संख्या २०० पेक्षा अधिक असल्यास विद्यार्थी- शिक्षक गुणोत्तर (मुख्याध्यापक वगळता) ४० पेक्षा अधिक असणार नाही.		

- इयत्ता ६ वी से ८ वी

प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या	शिक्षक संख्या	मुख्याध्यापक	अंशकालीन निदेशक
१०० पर्यंत	गणित/विज्ञान-१ सा.शास्त्रे -१ भाषा -१ एकूण = ३	-	-
१०१ ते १०५	गणित/विज्ञान-१ सा.शास्त्रे -१ भाषा -१ एकूण = ३	१	कलाशिक्षण -१ शारीरिक /आरोग्य शिक्षण -१ कार्यशिक्षण -१ एकूण = ३
१०६ ते १४०	४	१	३
१४१ ते १७५	५	१	३
१७६ ते २१०	६	१	३
२११ ते २४५	७	१	३
२४६ ते २८०	८	१	३
टिप :- विद्यार्थीसंख्या १०५ च्या पेक्षा अधिक असल्यास विद्यार्थी - शिक्षक गुणोत्तर (मुख्याध्यापक वगळता) ३५ पेक्षा जास्त असणार नाही			

२) इमारत :

(एक) प्रत्येक शिक्षकासाठी किमान एक वर्गखोली आणि कार्यालय, भांडार आणि मुख्याध्यापकांची खोली.

(दोन) अडथळाविना प्रवेशमार्ग.

(तीन) मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह.

(चार) सर्व मुलांसाठी स्वच्छ व पुरेसे पिण्याचे पाणी पुरविण्याची सुविधा.

(पाच) शाळेत दुपारचे जेवण जेथे शिजविले जाते तेथे एक स्वयंपाकघर.

(सहा) क्रीडांगण

(सात) शाळेच्या इमारतीच्या सुरक्षिततेसाठी आवारभिंत किंवा कुंपण घालून केलेली व्यवस्था असलेली पक्की इमारत.

३) शैक्षणिक वर्षात कामाचे किमान दिवस/शिक्षणाचे तास पूर्ण होतात किंवा नाही याबाबत संनियंत्रण करणे.

वर्ग प्रकार	कामाचे किमान दिवस	शिक्षणाचे तास
१ ते ५	२००	८००
६ ते ८	२२०	१०००

(४) शिक्षकासाठी प्रत्येक आठवड्याला कामाचे किमान तास : पाठाची तयारी करण्यासह अध्यापनाचे ४५ तास

(५) अध्यापन- अध्ययन सामुग्री-प्रत्येक वर्गाच्या गरजेनुसार पुरविण्यात येईल.

(६) ग्रंथालय- प्रत्येक शाळेमध्ये वर्तमानपत्र, मासिके आणि गोष्टींच्या पुस्तकासह सर्व विषयावरील पुस्तके पुरविणारे एक ग्रंथालय असेल.

(७) खेळण्याचे साहित्य/खेळ व क्रीडा विषयक सामुग्री - प्रत्येक वर्गाच्या गरजेनुसार पुरविण्यात येईल.